वेतनावरील खर्च नियंत्रित करणे.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०१५/प्र.क्र. ६४/२०१५/वित्तीय सुधारणा-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १५ जानेवारी, २०१६.

**वाचा -**

१) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकः संकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि.२.०६.२०१५.
२) शासन निर्णय सा.प्र.वि क्रमांकःएसआरव्ही-२०१५/प्र.क्र.२९०/का-१२, दि.१६.०७.२०१५.
३) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकःसंकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि.२३.०९.२०१५.
४) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकःसंकीर्ण-२०१५/प्र.क्र.४१/अर्थ-१, दि.१७.११.२०१५.

**प्रस्तावना -**

वेतनावरील खर्च नियंत्रित करण्याबाबतच्या संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयानुसार पदनिर्मितीस पूर्णपणे बंदी घातली असून रिक्त पदे भरण्याबाबत काही प्रमाणात निर्बंध घालण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयातील परिच्छेद ३(क) मध्ये काही संवर्गातील रिक्त पदांच्या ७५ टक्के इतक्या मर्यादेत पदे भरण्याची मुभा देण्यात आली आहे.

तथापि दुष्काळामुळे पडत असलेला अधिकचा आर्थिक भार व एकूण वित्तीय स्थितीचा विचार करता शासन खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय -**

संदर्भाधीन दि.०२ जून, २०१५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ३ (क) मध्ये नमूद केलेल्या संवर्गातील एकूण रिक्त पदांपैकी ७५ टक्क्यांच्या ऐवजी ५० टक्के पर्यंत पदे भरण्यास मुभा राहील.

दिनांक ०२ जून, २०१५ च्या शासन निर्णयातील अन्य तरतूदी कायम राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११५१७४४२५२१०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shubhangi Rajan Sheth

Digitally signed by Shubhangi Rajan Sheth
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032,
serialNumber=e52a2ce9d32e66b1d24d51eaca64e3ebef79bd73ef9543b72097c742eb1e708a,
cn=Shubhangi Rajan Sheth
Date: 2016.01.15 17:46:23 +05'30'

शुभांगी शेठ
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
४. सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक.
५. मंत्रालयीन सर्व विभाग.